Parinee Crescenzo, "A" Wing, 1102, 11th Floor,
"G" Block, Plot No. C38 & C39,
Behind MCA, Bandra Kurla Complex,
Bandra (E), Mumbai - 400 051, India.
Phone : 91-22-6124 0444 / 6124 0428
Fax : 91-22-6124 0438
E-mail : vinati@vinatiorganics.com
Website : www.vinatiorganics.com
CIN : L24116MH1989PLC052224

VINATI ORGANICS LIMITED

February 3, 2025

**BSE Limited**
(Listing Department)
P. J. Towers, 1st Floor,
Dalal Street, Mumbai – 400 001.

**Scrip Code: 524200**

**National Stock Exchange of India Ltd.**
(Listing Department)
Exchange Plaza, Plot No. C/1, 'G' Block,
Bandra-Kurla Complex,
Bandra (East), Mumbai – 400 051.

**NSE Symbol: VINATIORGA / Series: EQ**

Dear Sir/Madam,

**Sub: Newspaper Publication - Compliance under Regulation 30 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015.**

In terms of the Regulation 30 read with Schedule III of the SEBI (Listing Obligations and Disclosures Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations"), please find enclosed herewith extract of the following newspapers, containing publication of Unaudited Standalone and Consolidated Financial Results for the quarter and nine months ended December 31, 2024;

1. The Economic Times
2. The Maharashtra Times

Kindly take this information on record.

Thanking you,

Yours faithfully,
For **Vinati Organics Limited**

MILIND ARVIND WAGH Digitally signed by MILIND ARVIND WAGH Date: 2025.02.03 10:08:53 +05'30'

**Milind Wagh**
**Company Secretary/Compliance Officer**

Encl: As above

# VINATI ORGANICS LIMITED

Regd. Office : B-12 & B-13/1, MIDC Indl. Area, Mahad - 402 309, Dist. Raigad, Maharashtra.
Corp. Office: Parinee Crescenzo, 1102, 11th Floor, "G" Block, Plot No. C38 & C39, Behind MCA, BKC, Bandra (E), Mumbai – 51.
Phone - +91-22-61240444/28, Fax - +91-22-61240438
CIN - L24116MH1989PLC052224, Email - shares@vinatiorganics.com, Website - www.vinatiorganics.com

**Extract of Consolidated Unaudited Financial Results for the Quarter and Nine Months ended December 31, 2024**

(₹ in Crores, Except EPS)

| | Particulars | Quarter Ended | | Nine Months Ended |
|---|---|---|---|---|
| | | 31.12.2024 | 31.12.2023 | 31.12.2024 |
| | | (Unaudited) | | (Unaudited) |
| 1. | Total income from operations | 521.68 | 447.99 | 1,599.71 |
| 2. | Net profit / (loss) for the period before tax | 126.62 | 103.14 | 372.28 |
| 3. | Net profit / (loss) for the period after tax | 93.70 | 76.94 | 282.21 |
| 4. | Total Comprehensive Income for the period (Comprising Profit for the period after tax and other comprehensive income after tax) | 93.58 | 76.81 | 281.83 |
| 5. | Paid up equity share capital | 10.37 | 10.37 | 10.37 |
| 6. | Earnings per share (before extraordinary items) (of ₹ 1/- each) | | | |
| | Basic | 9.04 | 7.42 | 27.22 |
| | Diluted | 9.04 | 7.42 | 27.22 |
| 7. | Earnings per share (after extraordinary items) (of ₹ 1/- each) | | | |
| | Basic | 9.04 | 7.42 | 27.22 |
| | Diluted | 9.04 | 7.42 | 27.22 |

Reserves (excluding Revaluation Reserve) as on 31st March, 2024 is ₹ 2451.19 Crore.

**Notes:**

The above is an extract of the detailed format of Financial Results for the quarter and nine months ended 31.12.2024 filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the financial results are available on the websites of BSE and NSE at www.bseindia.com and www.nseindia.com respectively and on Company's website at www.vinatiorganics.com. The same can be accessed by scanning the QR Code provided below:

**Key numbers of Unaudited Standalone Financial Results :**

(₹ in Crores)

| | Particulars | Quarter Ended | | Nine Months Ended |
|---|---|---|---|---|
| | | 31.12.2024 | 31.12.2023 | 31.12.2024 |
| | | (Unaudited) | | (Unaudited) |
| 1. | Revenue from operations | 521.67 | 447.99 | 1,599.65 |
| 2. | Profit before tax | 128.86 | 103.22 | 378.86 |
| 3. | Net Profit after tax | 95.55 | 77.02 | 287.66 |


These results have been reviewed and recommended by the Audit Committee and have been approved and taken on record by the Board of Directors at its meeting held on 01.02.2025.

Place : Mahad
Date : 01/02/2025

For Vinati Organics Limited
Sd/-
Vinati Saraf Mutreja
Managing Director & CEO
DIN : 00079184

**Learn How To Find Long-Term Investment Opportunities & Avoid Bad Stocks**
with ET THE ECONOMIC TIMES

25 HOURS OF INTERACTIVE LEARNING | LIVE Q&A WITH EXPERTS | PRACTICAL HANDS-ON EXERCISES | 4.6/5 RATING ★★★★★



**Value & Valuation**
LIVE MASTERCLASS

**WHAT YOU'LL LEARN**

- **Finding Red Flags in Balance Sheet**
- Building a Strong Foundation in Value Investing
- Mastering Financial Statement Analysis
- Using Fundamental Ratios for Stock Valuation
- Identifying Competitive Advantages (Moats)
- Understanding Valuation Techniques (DCF and Relative Valuation)
- Real-World Case Studies for Practical Application

Certificate by The Economic Times

SEATS ARE FILLING FAST, REGISTER TODAY!
SCAN TO REGISTER
Whatsapp
9560500838
valuation@economictimes.com

UNION BUDGET 2025-2026



INCOME TAX DEPARTMENT

# EMPOWERING THE MIDDLE CLASS EMPOWERING INDIA

**MAJOR INCOME TAX RELIEF FOR MIDDLE CLASS**

- No income tax for persons having income upto ₹ 12 lakh
- No Income Tax upto ₹ 12.75 lakh per annum for Salaried Class (including Standard Deduction of ₹ 75,000)
- The taxpayers can now claim NIL annual value for two self-occupied properties without any conditions
- The annual limit of ₹ 2.4 lakh for TDS on rent to be increased to ₹ 6 lakh
- Limit for tax deduction on interest for senior citizens to be doubled from the present ₹ 50,000 to ₹ 1 lakh
- The time period for filing the updated return has been extended from 24 months to 48 months from the end of the relevant assessment year to reaffirm trust in the taxpayers
- National Savings Scheme (NSS) withdrawals now tax free for amount deposited on or after the 29th August, 2024

**NEW SLABS AND TAX RATES**

| Total income | Rate of tax |
|---|---|
| Upto ₹ 4 Lakh | Nil |
| From ₹ 4 Lakh to ₹ 8 Lakh | 5% |
| From ₹ 8 Lakh to ₹ 12 Lakh | 10% |
| From ₹ 12 Lakh to ₹ 16 Lakh | 15% |
| From ₹ 16 Lakh to ₹ 20 Lakh | 20% |
| From ₹ 20 Lakh to ₹ 24 Lakh | 25% |
| Above ₹ 24 Lakh | 30% |

CBC 15401/13/0014/2425

For Website | Income Tax Department | Central Board of Direct Taxes | For FAQs

@IncomeTaxIndia @IncomeTaxIndia.Official @IncomeTaxIndiaOfficial @IncomeTaxIndiaOfficial www.incometax.gov.in

# दाहक नाट्यानुभव

राजीव जोशी

मराठी नाटकांमध्ये 'पुरुष'मधील 'गुलाबराव' आणि 'बंडा'ने दिलेली शिक्षा आजही प्रेक्षकांच्या मनात घर करून राहिलेली आहे. ख्यातनाम नाटककार जयवंत दळवींच्या जन्मशताब्दीनिमित्त होणारे नवीन संचातील सादरीकरण हे पूर्वीच्या नामवंत संचाइतकेच आजही परिणामकारक वाटते. पुरुषी हलकटपणा, राक्षसीवृत्ती आजही अनिर्बंध आहे हे भीषण समाजवास्तव आहे. दळवींच्या व्यक्तिरेखा व नाट्य अंतर्मुख करते याचे श्रेय अर्थातच निर्माता-त्रयी, दिग्दर्शक राजन ताम्हाणे आणि संवेदनशील कलावंताना. पण अशी समस्या कालातीत असणे ही महासत्ता बनणाऱ्या लोकशाही देशातील सर्वसामान्यांसाठी शोकांतिकाच.

'पुरुष' नाटक पुनरुज्जीवित करावेसे वाटणे हेच मोठे आव्हानात्मक. अनेक वर्षे अभिनय, दिग्दर्शन व तंत्रज्ञ म्हणून अनुभवसिद्ध राजन ताम्हाणे, अभिनेता म्हणून लोकप्रिय असलेले शरद पोंक्षे, ज्येष्ठ अभिनेते अविनाश नारकर, तरुण अभिनेत्री स्पृहा जोशी तसेच अनुपमा, निषाद, नेहा या कलावंतांची समरसता दिसते. पडदा उघडल्यावर मध्यमवर्गीय आदर्श शिक्षकाचे घर दिसते. चाळसदृश्य खोल्या, बाल्कनीत असलेल्या गुलाब-कुंड्या, घरातील भिंतींचा रंग व मोजक्या तसबिरीद्वारे नेपथ्यकार प्रदीप पाटील ह्यांनी आपटे-घर उभे केलेले आहे. दुसरीकडे सरकारी डाक-बंगल्यातील खिडकी-दरवाजे व रंगीत तावदाने व मध्यभागी असलेला सोफा जो पुढे क्लायमॅक्स भेदक करण्यास हातभार लावतो. ( इंदिरा गांधींची तसबीर-कालनिर्देशक) नाटकातला 'काळ' पूर्वीचा असला तरी त्यातील व्यक्तिरेखांचे अनुभव-विश्व, शोषक-शोषित व सामान्य माणूस या त्रैराशिकात आज काही फरक पडलेला नाही. निर्भयासारखी प्रकरणे घडूनही कायद्याची जरब नाही की पुरुषी मानसिकतेत बदल नाही.

सत्ता-पैसा हाती असलेले लोक आपले पुरुषत्व सिद्ध करण्यासाठी स्त्रियांना भोगवस्तू म्हणून उपभोगत आहेत. चळवळी ओसरलेल्या आहेत, समाजमाध्यमे नको तिथे साप-साप म्हणून भुई थोपटताहेत. परिणामी पीडितांच्या वेदनेला क्वचितच दिलासा-पाठबळ मिळताना दिसते. दळवीचा 'बंडा' आज दिसत नाही, कदाचित त्यालाही भीती असेल! मात्र कायद्याने शिक्षा होईल, न्याय मिळेल हा भाबडा आशावाद तस्साच आहे. दिग्दर्शक राजन ताम्हाणे ह्यांनी सर्व पात्रांचा, कथानकातील प्रसंगांचा सखोल अभ्यास केल्याचे जाणवते. काही प्रसंग शार्प केले आहेत, तरीदेखील नामांतर-प्रश्न, दलित चळवळ व अन्य सामाजिक संदर्भ तसेच ठेवावे लागले आहेत. सवर्ण-दलितांच्याबाबतीतील शेरे-टिपण्णी, टाकलेल्या स्त्रीची व्यथा, उत्तान जाहिरात हे संदर्भ कालबाह्य झाल्याने वेळेचा अपव्यय होतोय की त्यामुळे मुख्य आशयावरील फोकस ढळतो का? (विशेषतः पहिल्या अंकांची मांडणी! )



'आदर्श शिक्षक' पुरस्कार मिळाल्याच्या आनंददायी घटनेतून हे नाटक उभे राहते. पुढे वरकरणी नायक वाटणारा गुलाबराव येतो, त्याच्या घृणास्पद कृत्यामुळे संपूर्ण कुटुंबाचे सरळरेषीय जगणेच उजाड-उध्वस्त होऊन जाते. आपण आदर्श असल्याचा मानसन्मान मिरवण्याचे, परित्यक्तेशी लग्न करून आधार दिल्याचे मोठेपण, मुलीच्याबाबतीत घडलेल्या भीषण प्रसंगानंतर तिला उभारी देण्याचे पितृ-कर्तव्य अशा अनेक छटा अभिनेते अविनाश नारकर ह्यांनी लंगडत चालणे, हातवारे, हालचाली व आवाजाच्या वापरातून ताकदीने प्रकट केल्या आहेत. आजवरच्या प्रखर-करारी भूमिकांपेक्षा ही साधी पण सोपी नसलेली भूमिका वठवलेली आहे. जाहिरातीबाबत ठाम भूमिका घेणारे अण्णा, त्यांची गांधी टोपीच्या गैरवापराबाबतची उद्विग्नता आणि जर कायद्याने प्रश्न सुटणार नाही, मग सुटणार कसे? कधी? असे प्रश्न विचारून आपल्याला अंतर्मुख करतात. अंबूच्या आईची-ताराची भूमिका करणाऱ्या अनुपमा ताकमोगे ह्यांना अगदी प्रथम वाक्यापासून भूमिकेचा आत्मा गवसल्याप्रमाणे काम केले आहे. मुंग्यांशी बोलणे, नवऱ्याच्या उपकारापायी सहन करावे लागणारे टोमणे, सिद्धार्थबाबतचे तीव्र असे जातीभेदाचे पारंपरिक विचार हे सारे त्यांनी सूक्ष्मपणे दाखवले आहे. त्यांच्या तोंडी असलेल्या कोपरखळ्यांना प्रेक्षक उत्स्फूर्तपणे दाद देतात, इथे दळवींचे संवादप्रभुत्व जाणवते.

चौथी भिंत

अंबूवरील अत्याचारानंतरचे तिचे कोसळणे हृदयद्रावक असले तरी ते कौटुंबिक नाटकातील मेलोड्रामा धर्तीचे नाही. अर्थात दिग्दर्शक ताम्हाणे ह्यांनी प्रसंग बांधणीतून हे खूप भेदकपणे उभे केलेले आहे. कोर्ट दृश्याआधी अंबूने आईला 'तोंडाला दर्प येतो' असे बोलणे आणि कोर्टाच्या निकालानंतर टेबलवर ताराचा फोटो टेबलवर ठेवणे. शिवाय घरातील खुर्ची व नेमक्या प्रकाशयोजनेद्वारे कोर्ट सीन उभा राहतो. मात्र उलटतपासणी चालू असतांना दुर्दैवाने हास्य-विनोद घडतात. तेव्हा आणि गुलाबरावाच्या काही वाक्यांना प्रेक्षक अस्थानी दाद देतात. ह्याचा अर्थ गुलाबराव ही व्यक्तिरेखा खलनायकी असूनही समाजाने-राजकारणाने नायकपद दिले आहे का? पूर्वीची हिंदी सिनेमातील रेप-सिन्स एन्जॉय करण्याची आंबटशौकीन मानसिकता आज पोर्न पाहून कमी झाली की वाढली? पण आपल्या नाटकाचा प्रेक्षक हा सुजाण आहे, आशय-गांभीर्य जाणणारा आहे. दळवींचे नाटक तेव्हाही व आजही सनसनाटी म्हणून सादर केले गेले नाही. त्याच्या हलकटपणाचा कळस म्हणजे अत्याचार केल्यावरही माफी मागण्याच्या इराद्याने बिनदिक्कतपणे आपट्यांच्या घरांत येतो. तेव्हाचे जखमेवर मीठ चोळणे, निर्लज्जपणे उमेदवारीला पाठिंबा मागणे हा धूर्तपणा दळवी यांनी टिपला होता. अनुभवी अभिनेते पोंक्षे ह्यांनी ही भूमिका अत्यंत स्वतंत्र शैलीत साकारली आहे.

चार दशकांपूर्वीचा पुढारी आणि आजचा नेता यांतील गुणावगुणांचे स्थित्यंतर शरद ह्यांनी खुबीने उभे केले आहे. प्रथमदर्शनी हा इसम गुंड किंवा व्हिलन नाही, आदर्श नेता असल्याचा मुखवटा मात्र त्याने बेमालूमपणे घेतला आहे. पण अंतरंगातील राक्षसी प्रवृत्ती योग्यवेळी बाहेर काढण्याचे, दडवण्याचे कौशल्य त्यांनी वाचिक व देहबोलीतून दाखवले आहे. गुलाबरावाने जबरदस्ती करताना, हा पुरुषांचा हक्क आहे, असे सांगत बलात्कारबाबतचे स्व-तत्वज्ञान सांगणे, स्त्रियांनी विरोध केला नाहीतर बलात्कार घडणार नाहीत, अशी वल्गना करणे हे सारे उद्दामपणाचे; याउलट शेवटच्या प्रसंगातील लाचारी-दयनीय अवस्था. ह्यातून बोचणारे दांभिक वास्तव अधोरेखित होते. अंबिकेची भूमिका करतांना स्पृहा जोशीचे दिसणे, वावरणे हे कोणत्याही मध्यमवर्गीय घरातील सर्वसामान्य मुलीचे वाटते. पुढे आकस्मिकपणे अत्याचार झाल्यावरचे कोसळणे, उन्मळणे नैसर्गिक वाटते. पण ती दीन न होता त्याला पुन्हा भेटायला जाते व बंडाच्या सहाय्याने धडा शिकवते. तिथे गेल्यावरचा नखशिखांत बदल-ठामपणा खूप काही सांगून जातो. एकीकडे पुरुष व्यक्तिरेखांचे तीन नमुने उभे करताना दळवी ह्यांनी आई, मथु या दोघी सोशिक दाखवलेल्या आहेत. पण अत्याचार-पश्चात अंबूमध्ये येणारे धैर्य-सामर्थ्य आजच्या मुलीनाही स्फूर्तिदायक आहे. सिद्धार्थ म्हणून निषाद भोईरने वैचारिक बांधिलकी व बोटचेपी तडजोड हा व्यावहारिक बदल नीटपणे दाखवला आहे. मथूची भूमिका नेहा परांजपे ह्यांनी केली आहे. विजय गवंडे ह्यांनी दुःखद व अत्याचार घटनेसंदर्भात प्रभावी संगीत दिले आहे. रंगभूषा व वेशभूषा व्यक्तिरेखांना पोषक आहे. दळवींनी प्रतिकात्मक शेवट दिला, पुढे काय? परदेशांत केमिकल-सर्जिकल castration अशा पर्यायी शिक्षा दिल्या जात आहेत. पण मुळात पुरुषातील पशुत्व रोखण्यासाठी कायद्याच्या चौकटीत, मानसशास्त्रीयदृष्ट्या काय करता येईल असा विचार व्हायला हवा. कदाचित अशा कलाकृतींचा आरसा जालीम उपायाच्या शोधास कारणीभूत ठरू शकेल!

- **नाटकाचे नाव :** पुरुष
- **लेखक :** जयवंत दळवी
- **दिग्दर्शन/प्रकाशयोजना :** राजन ताम्हाणे
- **नेपथ्य :** प्रदीप पाटील
- **संगीत :**विजय गवंडे
- **रंगभूषा :**संदीप नगरकर, प्रदीप दर्णे
- **वेशभूषा :**मंगल केंकरे
- **निर्माते :** शरद पोंक्षे, श्रीकांत तटकरे, समिता भरत काणेकर
- **कलाकार :** अनुपमा ताकमोगे, नेहा परांजपे, अविनाश नारकर, निषाद भोईर, ऋषिकेश रत्नपारखी, संतोष पैठणे व स्पृहा जोशी आणि शरद पोंक्षे

# भाडेवाढ झाली; दर्जावाढ कधी?

महेश चेमटे
Mahesh.Chemte@timesgroup.com

**रिक्षा-टॅक्सी व्यवसायावर घर चालवणाऱ्यांना आर्थिक स्थैर्यता देण्यासाठी राज्य सरकार नियंत्रित मुंबई महानगर प्रदेश परिवहन प्राधिकरणाने त्यांना भाडेवाढ मंजूर केली. या पार्श्वभूमीवर, प्रवास महागला; मात्र प्रवासी सेवेच्या दर्जाची उन्नती कधी होणार, हा साधा प्रश्न महामुंबईतील कोट्यवधी प्रवाशांचा आहे.**



नव्या वर्षात अपेक्षित असलेली रिक्षा-टॅक्सीच्या मीटर दरात ३ रुपये वाढ जानेवारीतील शेवटच्या आठ दिवसात मंजूर झाली. फेब्रुवारीच्या पहिल्या दिवसापासून ही वाढ लागूही झाली. वाढलेले इंधनदर, सुट्या भागांच्या किंमती यांमुळे ही वाढ आधीच होणे गरजेचे होते. उशिरा का असेना प्राधिकरणाने दरवाढ मंजुरीचा निर्णय घेतला. त्यामुळे रिक्षा-टॅक्सी चालकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

**किमान अंतरात कमाल भाडे**

घराबाहेर पडल्यावर रेल्वे स्थानक, एसटी स्थानक, रुग्णालय, शाळा, महाविद्यालय, सर्व सरकारी आणि खासगी कार्यालय अशा किमान अंतरात सर्वसामान्यांना रिक्षासाठी २८ आणि टॅक्सीकरिता ३१ रुपये मोजावे लागत आहेत. मुळात अनेक ठिकाणी अंतर १ किलोमीटरपेक्षा देखील कमी असते. अशावेळी दीड किलोमीटरचा पहिला टप्पा म्हणून २८ रुपये मोजावे लागणार आहेत. त्यामुळे प्रवाशांमध्ये नाराजी आहे. हाच विचार करत प्रवासी संघटनाकडून किमान टप्पा एक किलोमीटर करण्याची मागणी ही करण्यात आली आहे. मात्र त्यावर निर्णय होऊ शकला नाही.

**मीटरसह शेअर चालक ही बेशिस्त**

शहर आणि उपनगरातील रेल्वे / मेट्रो / बस स्थानक परिसरात रिक्षा आणि टॅक्सींचे मोठे जाळे आहे. यात मीटर आणि शेअरवर धावणाऱ्या या दोन्ही प्रकारच्या गाड्यांचा समावेश आहे. दोन्हीचे प्रवासी भाडे जरी वेगवेगळे असले तरी त्यांत एका गोष्टीचे साम्य आहे, ती म्हणजे बेशिस्त. बेदरकारपणे वाहने चालवणे, पदपथावरून वाहन चालवणे, समोरच्या वाहनाचालकाच्या अंगावर गाडी नेऊन ऐनवेळी कट मारणे असे प्रकार रिक्षाचालक सर्रास करतात. तीन आसनक्षमता असलेल्या शेअर रिक्षामध्ये चार ते पाच प्रवाशांची वाहतूक केली जाते. काही चालक नियमानुसार प्रवासी वाहतूक करतात; मात्र बेशिस्त चालकांच्या तुलनेत त्यांची संख्या खूप कमी आहे.

**स्वयंरोजगार ते स्वयंशिस्त**

परवानाधारक असलेले रिक्षाचालक बंधनकारक असतानाही गणवेश, बॅज, बिल्ला वापरत नाहीत. याची दखल घेत आरटीओ, वाहतूक पोलिस यांच्याकडून कारवाईचा बडगा उगारलाही जातो. मात्र कारवाईचे चार दिवस पूर्ण होताच पुन्हा गणवेशाची जागा जीन्स-शर्ट/टी शर्ट असे कपडे घेतता. स्वयंरोजगाराचा व्यवसाय, अशी ओळख मिरवणारे रिक्षा, टॅक्सीचालक यांना स्वयंशिस्त किमान भाडेवाढीनंतर तरी लागणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**सुरक्षेची भावना हवी**

मुंबईसारख्या शहरांमध्ये रात्री उशिरा प्रवास करणारे प्रवासी, महिला प्रवासी काळ्या-पिवळ्या टॅक्सीला, उपनगरात रिक्षाला प्राधान्य देतात. टॅक्सी-रिक्षासह एकूणच परिवहन सेवेतील सुरक्षेबाबत प्रशासकीय यंत्रणेने बेफिकीर न राहता प्रवाशांना निश्चित दरामध्ये विश्वासार्ह सुरक्षित सेवा कशी उपलब्ध होईल, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

पुरेसा प्रकाश असणे, आपत्कालीन स्थितीसाठीचा मदत क्रमांक दर्शनी भागात ठळकपणे चिटकवणे, चालकाचे नाव / वाहन क्रमांक आणि अन्य सर्व तपशीलवार माहिती अशी माहिती वाहनात असावी, तक्रार करण्यासाठी स्थानिक आरटीओचा मदत क्रमांक अशा उपायाने प्रवाशांमध्ये विश्वासाची भावना निर्माण होण्यास मदत होईल. यासाठी पालक म्हणून राज्य सरकार नियंत्रित प्राधिकरणाने नियम तयार करावेत आणि स्थानिक प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) त्याची अंमलबजावणी योग्य होत असल्याची खात्री करावी.

सिटीस्कॅन

**आता तरी भाडे नाकारू नका**

रिक्षा-टॅक्सीचालकांकडून जवळच्या अंतरावरील भाडे नाकारण्याचा अनुभव सर्वसामान्यांना नवा नाही. परतीचे भाडे मिळत नाही, वाहतूक कोंडी असते, अशी अनेक कारणे समोर करीत चालक युक्तिवाद करतात. आता भाडेवाढ झाल्याने किमान जवळच्या अंतरावरील भाडे नाकारू नये, अशी अपेक्षा जास्त भाडे देणाऱ्या प्रवाशांची आहे. तसेच रिक्षा-टॅक्सी चालकांनी अरेरावीची भाषा सोडून सौजन्याची भाषा वापरून प्रवाशांशी संवाद साधल्यास प्रवासी आणि चालक यांच्यातील वाद संपुष्टात येतील. त्यामुळे त्याबाबतही चालकांनी विचार करायला हवा.

**प्रवाशांनो, जागरूक व्हा**

भाडे नाकारणे, बेशिस्त वर्तन, अरेरावी आणि छेडछाड, योग्य गणवेश नसणे, बॅज-बिल्ला नसणे याबाबत प्रवाशांनी आता बोलते होणे गरजेचे आहे. यासाठी परिवहन आयुक्त, वाहतूक पोलिस, आरटीओ यांनी आपापल्या पातळीवर प्रवासी केंद्रित मोहिमा राबवणे गरजेचे आहे. रिक्षा-टॅक्सी ही आधी सेवा आहे, आणि नंतर तो व्यवसाय याची जाणीव चालकांना विशेषतः रिक्षा-टॅक्सी संघटनांना करून देण्याचे मुख्य काम प्रशासनाचे आहे. चालकांची 'हम करे सो कायदा' ही वृत्ती मोडीत काढण्यासाठी संघटनांनी मार्गदर्शक तत्त्वे आखून देणे गरजेचे आहे. प्रशासनाचे हे काम सुलभ व्हावे, यासाठी सर्वसामान्य नागरिकांनी बोलते होणे, पुढाकार घेणे, तक्रार करणे अत्यंत गरजेचे आहे.

**सुरक्षित पर्यायाची चाचपणी व्हावी**

सर्वसामान्यांचा प्रवास अगदी शेवटच्या टप्प्यापर्यंत सुलभ व्हावा, यासाठी राज्य सरकारकडून धोरण राबवण्यात येत आहे. रस्त्यांची मर्यादा, चिंचोळ्या गल्ल्या लक्षात घेत धोरणाच्या पूर्ततेसाठी शेवटच्या टप्प्यापर्यंत प्रवासासाठी तूर्त रिक्षा-टॅक्सीला पर्याय नाही. मात्र वाढती लोकसंख्या आणि सर्वसामान्यांच्या गरजा लक्षात घेता सुरक्षित नव्या अर्थात बाइक टॅक्सी, महिला चालक अशा पर्यायांची चाचपणी होणे गरजेचे आहे. मात्र 'प्रवासी सुरक्षितता, सुलभता आणि सहजता' हीच केंद्रस्थानी ठेवून त्याचा विचार व्हावा. स्पर्धात्मक पद्धतीच्या अंतीच प्रवाशांना दर्जेदार सुविधा उपलब्ध होतील.

# रत्नागिरीसाठी ८६० कोटींच्या आराखड्याला मंजुरी

म. टा. वृत्तसेवा, चिपळूण




राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर, रत्नागिरी जिल्ह्याची नियोजन समितीची पहिलीच बैठक रविवारी रत्नागिरीत झाली. सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ साठी ८६०.२१ कोटी रुपयांच्या आराखड्यास या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात पालकमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत गृहराज्यमंत्री योगेश कदम, खासदार सुनील तटकरे, खासदार नारायण राणे, आमदार प्रसाद लाड, भास्कर जाधव, शेखर निकम, किरण सामंत, जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजार आदी उपस्थित होते. कोणत्या विभागात किती खर्च झाला, झाला नसेल तर त्याची कारणे काय, याबाबत जिल्हाधिऱ्यांनी आढावा घ्यावा, जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून अधिकाऱ्यांनी जनसुविधेला प्राधान्य द्यावे, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

'मागील वर्षी जिल्ह्याच्या तरतुदीमध्ये भरीव वाढ झाली आहे. यावर्षीही ती होईल. ८६० कोटींचा आराखडा बनविण्यात आला असून, राज्य नियोजन समितीच्या बैठकीमध्ये त्याबाबत मागणी केली जाईल. जनसुविधेला प्राधान्य देताना १०० टक्के निधी खर्च झाला पाहिजे, त्याबाबत अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी. नगरपंचायत, नगरपालिका यांचा विकासात्मक डीपीआर तयार करावा. प्रत्येक शहराचा विकासात्मक नियोजन करताना लागणाऱ्या निधीबाबत सविस्तर माहिती द्यावी. प्रत्येक तालुकानिहाय जेट्टींचा प्रस्ताव तयार करून द्यावा,' अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

रत्नागिरी जिल्हा परिषदेने गोळप येथे उभारलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पातून निर्माण झालेला 'रत्नागिरी पॅटर्न' राज्यात उदयास आला आहे. त्याचबरोबर गुणवत्तेचा शोध घेऊन इस्त्रो आणि नासासाठी जिल्हा परिषदेमार्फत विद्यार्थ्यांना पाठविण्यात येत आहे. हा उपक्रम राज्यातील सात जिल्ह्यांनी स्वीकारला आहे. गुहागरमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याबाबत योग्य नियोजन करावे, जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा नियोजन समितीबाबतचा आढावा दर १५ दिवसांनी घ्यावा, असे आदेश त्यांनी दिले.

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित
चुनाभट्टी शाखा
"उद्घाटन सोहळा"
सोमवार, दि. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी, सकाळी १०.०० वाजता
कार्यक्रमाचे उद्घाटक
मा. ना. श्री. राहुलजी नार्वेकर
विधानसभा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य
कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा. आ. श्री. प्रविणभाऊ दरेकर
भाजपा गटनेते - महाराष्ट्र विधानपरिषद
अध्यक्ष - मुंबई जिल्हा बँक
प्रमुख पाहुणे
मा. आ. श्री. प्रसाद लाड, संचालक - मुंबई जिल्हा बँक
मा. आ. श्री. सुनिल राऊत, संचालक - मुंबई जिल्हा बँक
मा. श्री. शिवाजिराव नलावडे, संचालक - मुंबई जिल्हा बँक
मा. श्री. नंदकुमार काटकर, संचालक - मुंबई जिल्हा बँक
सदर उद्घाटन सोहळ्यास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.
निमंत्रक
संदिप सी. सुर्वे, मुख्य सरव्यवस्थापक
सिध्दार्थ टी. कांबळे, उपाध्यक्ष व संचालक मंडळ
डी. एस. कदम, कार्यकारी संचालक
स्थळ
मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शॉप नं. ५ व ६, तळमजला, मिस्त्री पॅलेस को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., त्रिमूर्ती सोसायटी जवळ, सायन-चुनाभट्टी, मुंबई ४०० ०२२

स्वप्नपूर्ती गृह कर्ज — घर खरेदीसाठी रू. 1.40 कोटींपर्यंत व्याज दर 7.50%*
उद्योग धंद्यासाठी सुलभ कर्ज — रू. 25 लाखांपर्यंत व्याजदर 8.50%* रू. 25 लाखांपुढे व्याजदर 9.50%*
सुखदायी वैयक्तिक कर्ज — रू. 5 लाखांपर्यंत व्याज दर 13%*
मनोरथ वाहन कर्ज — वाहन खरेदीसाठी 100% कर्ज व्याज दर 7.75%*
सोने तारण कर्ज — रू. 25 लाखांपर्यंत व्याज दर 7.95%*
ज्ञानवर्धिनी (शैक्षणिक कर्ज) — व्याज दर 8.50%*
NSC, KVP, LIC यावर कर्ज — व्याज दर 8.75%*
*अटी लागू
ठाणे भारत सहकारी बँक लि.
शेड्यूल्ड बँक
केंद्रीय कार्यालय : सहयोग मंदिर, सहयोग मंदिर पथ, घंटाळी, नौपाडा, ठाणे.
संपर्क : 25408076 | 25447816 | 9619193016
• www.tbsbl.com

VINATI ORGANICS LIMITED
Regd. Office : B-12 & B-13/1, MIDC Indl. Area, Mahad - 402 309, Dist. Raigad, Maharashtra.
Corp. Office: Parinee Crescenzo, 1102, 11th Floor, "G" Block, Plot No. C38 & C39, Behind MCA, BKC, Bandra (E), Mumbai – 51.
Phone - +91-22-61240444/28, Fax - +91-22-61240438
CIN - L24116MH1989PLC052224, Email - shares@vinatiorganics.com, Website - www.vinatiorganics.com

Extract of Consolidated Unaudited Financial Results for the Quarter and Nine Months ended December 31, 2024

(₹ in Crores, Except EPS)

| | Particulars | Quarter Ended | | Nine Months Ended |
|---|---|---|---|---|
| | | 31.12.2024 | 31.12.2023 | 31.12.2024 |
| | | (Unaudited) | | (Unaudited) |
| 1. | Total income from operations | 521.68 | 447.99 | 1,599.71 |
| 2. | Net profit / (loss) for the period before tax | 126.62 | 103.14 | 372.28 |
| 3. | Net profit / (loss) for the period after tax | 93.70 | 76.94 | 282.21 |
| 4. | Total Comprehensive Income for the period (Comprising Profit for the period after tax and other comprehensive income after tax) | 93.58 | 76.81 | 281.83 |
| 5. | Paid up equity share capital | 10.37 | 10.37 | 10.37 |
| 6. | Earnings per share (before extraordinary items) (of ₹ 1/- each) Basic Diluted | 9.04 9.04 | 7.42 7.42 | 27.22 27.22 |
| 7. | Earnings per share (after extraordinary items) (of ₹ 1/- each) Basic Diluted | 9.04 9.04 | 7.42 7.42 | 27.22 27.22 |

Reserves (excluding Revaluation Reserve) as on 31st March, 2024 is ₹ 2451.19 Crore.

Notes:
The above is an extract of the detailed format of Financial Results for the quarter and nine months ended 31.12.2024 filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the financial results are available on the websites of BSE and NSE at www.bseindia.com and www.nseindia.com respectively and on Company's website at www.vinatiorganics.com. The same can be accessed by scanning the QR Code provided below:

Key numbers of Unaudited Standalone Financial Results :

(₹ in Crores)

| | Particulars | Quarter Ended | | Nine Months Ended |
|---|---|---|---|---|
| | | 31.12.2024 | 31.12.2023 | 31.12.2024 |
| | | (Unaudited) | | (Unaudited) |
| 1. | Revenue from operations | 521.67 | 447.99 | 1,599.65 |
| 2. | Profit before tax | 128.86 | 103.22 | 378.86 |
| 3. | Net Profit after tax | 95.55 | 77.02 | 287.66 |

These results have been reviewed and recommended by the Audit Committee and have been approved and taken on record by the Board of Directors at its meeting held on 01.02.2025.

For Vinati Organics Limited
Sd/-
Vinati Saraf Mutreja
Managing Director & CEO
DIN : 00079184

Place : Mahad
Date : 01/02/2025